साफसफाईच्या रसायनामुळे पार्किन्सनचा धोका?

आरोग्य वार्ता

न्यू यॉर्क : पार्किन्सन कशामुळे होतो या प्रश्नाचे ठोस उत्तर संशोधकांना अद्याप सापडले नसले तरी हा रोग शरीरातील डोपामाइन आणि नॉरपेनेफ्रिनची पातळी घटण्याशी संबंधित असल्याचा दावा करण्यात येतो. तथापि, रोचेस्टर विद्यापीठातील संशोधकांचे ताजे संशोधन त्यापुढे जाणारे आहे. त्यांनी पार्किन्सन रोग आणि ट्रायक्लोरेथिलीन (टीसीई) नावाचे सर्रास वापरले जाणारे रसायन यांच्यातील परस्पर संबंध दाखवणारे निष्कर्ष काढले आहेत. हे रसायन साफसफाईसाठी वापरले जाते.

हा रोग जडण्याची आणखी काही कारणे सांगितली जातात. वयपरत्वे आणि पूर्वी कधीतरी मेंदूला इजा झाली असेल तर ही व्याधी होण्याची शक्यता असते. त्याशिवाय, कीटकनाशके आणि वायुप्रदूषण यांतून पसरणाऱ्या विशिष्ट विषारी रसायनांच्या संपर्कात आल्यामुळेही हा रोग होऊ शकतो, असाही दावा संशोधक करतात.

जगभरात ८.५ दशलक्षपेक्षा जास्त लोक पार्किन्सन रोगाने त्रस्त आहेत. ही मज्जासंस्थेवर दुष्परिणाम करणारी एक व्याधी आहे. शरीराची थरथर, हातपाय कडक होणे आणि संज्ञापनात अडचणी येणे ही या आजाराची सर्वसाधारण लक्षणे आहेत.

लठ्ठपणा, ॲसिडिटी, गॅसेस, अंगदुखी, जॉईंट्स पेन, सोरायसिस, डायबिटीस, पार्किंसन्स, बीपी, अस्थमा, चिल्ड्रेन्स हाइट - वेट गेन, केसगळती, पिंपल्स इ. विकारांवर उपचारासाठी भेटा
तन्वी घंटाळी ठाणे
9769695892
तन्वी दादर
9833683621
फ्री व्हाट्सअप सल्ला
9820075812
Tanvi HERBALS
तन्वी हर्बल क्लिनिक्स
रोज फ्री चेकअप
आजच अपॉइंटमेंट घ्या
आज 18 एप्रिल रोजी
फ्री हेल्थ चेकअप
वसंत विहार, ठाणे
वेळ : सायं. 5 ते 7 वा.
9004903932
फ्री फोन कन्सल्टेशन
9137231554

'समृद्धी'वर वेगमर्यादा धुडकावणाऱ्यांना प्रतिबंध!

प्रथमच स्वयंचलित यंत्रणेद्वारे कारवाई

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : समृद्धी महामार्गावर अतिवेगात गंतव्यस्थानी पोहोचलेल्या वाहनांना एमएसआरडीसीच्या स्वयंचलित यंत्रणेकडून सोमवारी प्रतिबंध घालण्यात आला. नागपूर आणि औरंगाबादला १२४ ते १२६ किलोमीटर प्रतितास धावलेल्या दोन वाहनांवर प्रथमच अशी कारवाई करण्यात आली.

जीवघेणे अपघात: समृद्धी महामार्गावर २२ जीवघेणे अपघात होऊन त्यात ४० जणांचा मृत्यू झाला आहे. यातील २२.७२ टक्के अपघात टायर फुटून, २७.२७ टक्के पुढच्या वाहनाला धडक देऊन, १८.१८ टक्के चालकाला डुलकी आल्याने झाले. अतिवेगाने वाहन चालवून ९.०९ टक्के आणि इतरही कारणांनी अपघात झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

ही कारवाई झालेल्या पहिल्या वाहनाने जालन्याहून समृद्धी महामार्गावर प्रवास सुरू केला व पथनाक्यापर्यंतचा प्रवास १२४ किलोमीटर प्रतितास वेगाने केला. विशेष म्हणजे, हे वाहन सुमारे २० मिनिटे इंधन भरण्यासाठी थांबलेही होते. त्यानंतरही वाहनाचा वेग १२४ किलोमीटर असल्याचे स्पष्ट झाल्याने हे वाहन दीडशेहून जास्त गतीने धावल्याचा अंदाज आहे.

दुसरी कारवाई नागपूरहून औरंगाबादला गेलेल्या एका चारचाकी वाहनावर करण्यात आली. हे वाहन येथून निघून औरंगाबादला १२६ किलोमीटर प्रतितास वेगाने पोहोचले. या दोन्ही वाहनांच्या चालकांचे सक्तीने समुपदेशन करण्यात आले. त्यांच्याकडून नियम पाळण्याबाबतचे शपथपत्रही घेतले गेले. याबाबत माहिती देताना, नागपूर ग्रामीणचे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण म्हणाले, नागपुरात यापुढे अतिवेगाने वाहन धावताना दिसल्यास कडक कारवाई केली जाईल.

वेगमर्यादा...

शासनाने समृद्धी मार्गावर कारची वेग मर्यादा १२० किमी प्रतितास, ट्रकची ८०, बसची १००, टँकरची ६० किमी प्रतितास निश्चित केली आहे.

Shri Ramnath Goenka
April 18, 1904 - October 5, 1991
"Be forthright, be frank,
Be fearless, whatever the odds.
Never hesitate to take a stand if you believe in it.
Never hesitate to speak out boldly against the wrongs.
And always, ensure that you illuminate the truth
behind the events."
INDIAN EXPRESS GROUP



देशातील करोना सक्रिय रुग्णसंख्येत केरळ खालोखाल महाराष्ट्र

राज्यात सुमारे ६०४७ रुग्णांवर उपचार सुरू

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : गेल्या काही दिवसांपासून करोना संसर्गाचे प्रमाण पुन्हा एकदा वाढत असून त्याचे प्रतिबिंब सक्रिय रुग्णांच्या संख्येतही स्पष्ट दिसून येत आहे. देशभर सध्या करोनाचे ५७ हजारांहून अधिक सक्रिय रुग्ण आहेत. त्यांपैकी सर्वाधिक रुग्ण केरळ, महाराष्ट्र, नवी दिल्ली, हरयाणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये आहेत.

ओमायक्रॉन या करोना विषाणू प्रकारामुळे निर्माण झालेल्या संसर्गाच्या लाटेत घट झाल्यानंतर सुमारे वर्षभराने गेल्या काही दिवसांपासून राज्यासह देशातील करोना रुग्णांच्या संख्येत स्थिर वाढ पहायला मिळत आहे. त्याच दरम्यान इन्फ्लूएन्झाच्या एच३एन२ चा संसर्गही काही भागांमध्ये वाढीस लागलेला पहायला मिळाला. त्यामुळे करोना चाचण्यांचे प्रमाण वाढल्याची एक शक्यता गृहीत धरण्यात आली. मात्र, सध्या देशातील दैनंदिन रुग्णसंख्येत मोठी वाढ दिसून येत असल्यामुळे त्याचा परिणाम सक्रिय रुग्णसंख्येवरही होताना दिसत आहे. केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार देशात ५७ हजारांहून अधिक करोना रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. केरळ, महाराष्ट्र, नवी दिल्ली, हरयाणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये दैनंदिन रुग्णसंख्येचा आलेखही सातत्याने चढता राहत आहे.

केरळमध्ये देशातील सर्वाधिक म्हणजे सुमारे २० हजार सक्रिय रुग्ण नोंदवण्यात आले आहेत. महाराष्ट्रात ही संख्या सहा हजारांच्या घरात आहे. नवी दिल्लीत ४,६००, हरयाणामध्ये ३,७०० तर उत्तर प्रदेशमध्ये तीन हजार सक्रिय रुग्णांची नोंद झाली आहे. या पाचही राज्यांमध्ये दररोज सुमारे पाचशे नव्या करोना रुग्णांची भर पडत आहे. कर्नाटक, राजस्थान, हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये सक्रिय रुग्णांची संख्या अद्याप दोन हजारांच्या खाली असून दररोज नव्याने निदान होणाऱ्या रुग्णांची संख्याही नियंत्रणात असल्याचे दिसून येत आहे.

सध्या रुग्णांची संख्या हा चिंतेचा विषय असला तरी दीर्घकाळ हा आलेख चढता राहणार नाही. पुढील काही दिवसांतच रुग्णसंख्येत घट होत जाऊन हा आजार 'एंडेमिक' होईल, असा दिलासा तज्ज्ञ डॉक्टरांकडून देण्यात येत आहे.

मे महिन्यात संसर्ग घटणार

राज्याचे करोना विषयक तांत्रिक सल्लागार डॉ. सुभाष साळुंखे म्हणाले, की देशातील काही ठरावीक राज्यांमध्ये आणि राज्यातील ठरावीक प्रदेशांमध्येच रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे ही वाढ संपूर्ण देशात सरसकट नाही, ही बाब दिलासादायक आहे. मे महिन्याच्या मध्यापर्यंत ही संख्या आटोक्यात येईल. तोपर्यंत सहव्याधीग्रस्तांनी संसर्ग होणार नाही याकडे लक्ष द्यावे, त्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांचा अवलंब करावा आणि उपलब्धतेप्रमाणे वर्धक मात्राही घ्यावी, असे मत डॉ. साळुंखे यांनी व्यक्त केले आहे.

राज्यात ५०५ नवे रुग्ण

मुंबई : राज्यात १७ एप्रिल रोजी करोनाचे ५०५ नवे रुग्ण सापडले आहेत. त्यामुळे आतापर्यंत करोना रुग्णांची संख्या ८१ लाख ५६ हजार ३४४ इतकी झाली आहे.

फेब्रुवारीच्या मध्यापासून राज्यामध्ये करोना रुग्णांच्या संख्येत हळूहळू वाढ होत आहे. मात्र मागील चार आठवड्यांमध्ये राज्यातील करोना रुग्णांच्या संख्येत तीन पटीने वाढ झाली आहे. २१ ते २७ मार्च या आठवड्यामध्ये राज्यामध्ये २ हजार १९४ करोना रुग्ण सापडले होते. मात्र ११ ते १७ एप्रिल या आठवड्यात करोना रुग्णांची संख्या ६ हजार ८७ इतकी झाली आहे.

राज्यामध्ये सातत्याने करोना रुग्ण संख्या वाढत आहे. २१ मार्च ते १७ एप्रिल या कालावधीत तब्बल १६ हजार ४७९ इतके करोना रुग्ण सापडले. यामध्ये २१ ते २७ मार्च या पहिल्या आठवड्यामध्ये २ हजार १९४ करोना रुग्ण सापडले. त्यानंतर २८ मार्च ते ३ एप्रिल या आठवड्यामध्ये करोना रुग्णांची संख्या ३ हजार ५३१ इतकी झाली. तसेच ४ ते १० एप्रिल या आठवड्यात पहिल्या आठवड्याच्या तुलनेत करोना रुग्ण संख्येत दुपटीने वाढ झाली. या आठवड्यात ४ हजार ६६७ रुग्ण सापडले. मात्र त्यापुढील आठवड्यात करोना रुग्णसंख्येत तिपटीने वाढ झाली.

MADE IN INDIA SINCE 1985
BOSS®
महा समर सेल
त्वरा करा!
स्टॉक संपण्या आधी घेऊन या.
ऑफर सर्व ब्लेन्डर्स वर उपलब्ध*
FREE WORTH ₹1695/-*
Double Walled Stainless Steel
1000 ML
BEAT THE HEAT WITH SOMETHING SWEET
Scan to View Product Catalogue
अधिक माहितीसाठी संपर्क :
कुलाबा ते लालबाग - 9152005836 / 9820871731
सीएसटी ते मुलुंड - 9152005836 / 9819931888
माटुंगा ते दहिसर - 9152005826 / 9821142324
मीरा रोड ते डहाणु - 9152005826 / 9309437305
ठाणे ते बदलापुर, नवी मुंबई - 9152005835 / 9324769339
B-121
B-807
SERVICE CENTRE NO : 9167681234
www.bossindia.com
ऑफर एम. आर. पी. वर*

INDIA'S BEST PERFORMING PORT
जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण
बंदर नियोजन आणि विकास विभाग
संक्षिप्त ई-निविदा सूचना
निविदा क्र.: पीपीडी/एम-1 /गेस्ट हाउस-1 /टी-15/2023 दिनांक 17.04.2023
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण "जे एन पी ए येथील विद्यमान व्हीआयपी गेस्ट हाउस अद्ययावत आणि आधुनिक करणे, चेहरा मोहरा बदलणे, अंतर्गत पुनर्व्यवस्था, वॉटर प्रूफिंग, आणि प्लंबिंग ची कामे करणे" या कामासाठी या निविदेमध्ये करार निविष्ट केलेल्या "किमान अर्हताकारी निकषांची" पूर्तता करणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांकडून दिनांक 18.04.2023 ते 15.05.2023 पर्यंत दोन लिफाफ्यांमध्ये "ऑनलाइन" बाब दर तत्त्वावर निविदा मागवीत आहेत. कामाचा अंदाजित रु. 19,09,99,703/- इतका आहे. निविदा मागणीच्या तपशीलवार सूचना तसेच निविदा दस्तऐवज जेएनपीएच्या www.jnport.gov.in किंवा https://eprocure.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.
मुख्य व्यवस्थापक
(बंदर नियोजन आणि विकास विभाग)

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
ई-निविदा मागविणारी सूचना
मुख्य अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि., खालील कामासाठी नामांकित कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई - निविदाकरण द्वारे एक बोली पद्धतीमध्ये खुली निविदा मागवित आहेत. कामाचे नाव: कोकण रेल्वेवरील वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी झोनमधे कि.मी. 154/100 ते कि.मी. 226/500 पर्यंत वरिष्ठ विभाग अभियंता, रत्नागिरी यांच्या अखत्यारीतील ट्रॅकच्या देखभालीसाठी कायमस्वरूपी क्षेत्रीय करार. (निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2023-02). अंदाजे मूल्य: ₹ 4,87,92,509/- जीएसटी वगळता. समाप्ती दिनांक/ वेळ: ऑन लाईन प्रस्ताव / बोलींच्या सादरीकरणासाठी 09.05.2023 रोजी 15:00 वा. पूर्तता कालावधी: पावसाळ्यासह चोवीस महिने. प्रत्यक्ष आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. कृपया तपशील/सहभागासाठी www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. शुद्धिपत्रक/जोडपत्र ह्याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

TATA
TATA POWER
THE TATA POWER COMPANY LIMITED
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Mumbai 400 001.
Tel: 91 22 6665 8282 Fax: 91 22 6665 8801 CIN: L28920MH1919PLC000567
Email: tatapower@tatapower.com Website: www.tatapower.com
NOTICE OF RECORD DATE
NOTICE is hereby given pursuant to Section 91 of the Companies Act, 2013 that:
(i) Wednesday, 17th May 2023 has been fixed as the Record Date for the purpose of payment of annual interest to the holders of 8.21% Unsecured, Redeemable, Taxable, Listed, Rated, Non-convertible Debentures (ISIN: INE245A08182) due on Friday, 2nd June 2023 and
(ii) Wednesday, 24th May 2023 has been fixed as the Record Date for the purpose of payment of annual interest to the holders of 5.70% Unsecured, Redeemable, Taxable, Listed, Rated, Non-convertible Debentures (ISIN: INE295J08071) due on Friday, 9th June 2023.
For The Tata Power Company Limited
Sd/-
H. M. Mistry
Company Secretary
Place: Mumbai
Date: 17th April 2023

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जळगांव
जाहीर ई-निविदा सूचना क्रमांक-जळगांव ०२/२०२३-२४
जळगांव जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना-२ संशोधन व विकास (R&D) अंतर्गत रस्ते दर्जोन्नती व ५ वर्ष देखभाल दुरूस्तीच्या एकुण ३ पॅकेजेस (१३ कामे, एकुण अंदाजित किंमत रक्कम रू. ४६४१.७२ लक्ष) ई-निविदा मागविण्यात येत आहे.
सदर कामांची बी१, ई-निविदा https://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. १९/०४/२०२३ पासुन उपलब्ध होईल.

ई-निविदा सुचना क्र.	एकुण कामे	एकत्रित अंदाजित किंमत
०२/२०२३-२४	१३	रू. ४६४१.७२ लक्ष

सही/-
(संजय राठोड)
कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जळगांव

kotak Kotak Mahindra Bank
कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
मत्तेची ऑनलाइन ई-लिलाव विक्री
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी२७, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड-४०० ०५१. शाखा कार्यालय : शॉप नं. ३, तळमजला व मेझ्झानाइन फ्लोअर, सम्राट क्यूबसीम, गंगापूर रोड, आनंदवली, नाशिक-४२२०१३.
स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल, २००२च्या रुल ९(१)च्या तरतुदी आणि रुल ८ (५) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना. याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या / ताब्यात असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा "बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" ("बीएचएफएल") द्वारा तिच्या नावे असलेल्या ऋणांच्या अभिहस्तांकनाच्या अनुसार ११.०१.२०२३ रोजी "कोटक महिंद्रा बँक लि."च्या ("केएमबीएल") प्राधिकृत अधिकारांद्वारा, घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री श्री. दिपक आनंदा पांडव व श्रीमती अश्विनी दिपक पांडव यांच्याकडील "केएमबीएल", सुरक्षित धनकोची देणी असलेली, कर्ज खाते क्र. ४आर२आरएचबी९५९९३८५६, ४आर२आरएचटी९९१९०७३८, ४आर२आरएचटी९६००५७६८ अंतर्गत संपूर्ण किंमत व आकारासह प्रदानापर्यंत १४.०४.२०२३ पासून पुढील लागू व्याजासह १३.०४.२०२३ रोजीप्रमाणे रु. ४४,२२,२२४/-(रुपये चव्वेचाळीस लाख बावीस हजार दोनशे चोवीस फक्त) या रकमेच्या वसुलीकरिता ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह ११.०५.२०२३ रोजी दु.१२:०० व दु.०१:०० दरम्यान "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे", आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे. राखीव किंमत रु. ३४,००,०००/- (रुपये चौतीस लाख फक्त) असेल आणि इसारा रक्कम ठेव रु. ३,४०,०००/- (रुपये तीन लाख चाळीस हजार फक्त) असेल व केवायसीसह इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख १०.०५.२०२३ रोजी सायं. ०६:०० वा. (भाप्रवे) आहे.
मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : डुप्लेक्स रो हाऊस नं. १, मोजमापाचे ११०.३८ चौ.मी. बिल्ट-अप, तळमजला व पहिला मजला + प्लॉटेड एरिआ मोजमापाचा ८९.२१ चौ.मी., "खुशाली रो हाऊसेस" म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पातील, प्लॉट नं. ९ वर बांधकाम केलेले, मोजमापाचे ४०१.५० चौ.मी., सर्व्हे नं. २६५/२/९ यापैकी, व्हिलेज म्हसरूल, ता. नाशिक, जि. नाशिक-४२२००३. उक्त मालमत्ता पुढीलप्रमाणे सीमित : पूर्वेच्या दिशेने : पॅसेज, पश्चिमेच्या दिशेने : कॉलनी रोड, दक्षिणेच्या दिशेने : डुप्लेक्स रो हाऊस नं. २, उत्तरेच्या दिशेने : ओपन स्पेस. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन ८च्या तरतुदींकडे लक्ष वेधीत आहोत. आम जनतेस आणि विशेषकरून ऋणकोंनी नोंद घ्यावी की, जे काही असेल त्या कारणास्तव निर्धारित लिलाव अयशस्वी ठरल्यास सुरक्षित धनको त्यांच्या स्वेच्छाधिकारावर खाजगीरित्या विक्रीद्वारा सुरक्षित हिताची अंमलबजावणी करतील. कोणतेही स्पष्टीकरण / मत्तेसंबंधित आवश्यक माहिती याकरिता संपर्क साधू शकतील : श्री. विकास सिंह (+९१ ८६६९१८९०४८), श्री. शंतनू नायसे (+९१ ९७६५५८०९९१), श्री. पंकज राय (+९१ ७७६८००३५६७) व श्री. राजेंदर दहिया (+९१ ८४४८२६४५१५). विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया https://www.kotak.com/en/bank-auctions.hyml या लिंकला भेट द्यावी. कोटक महिंद्रा वेबसाइट म्हणजेच www.kotak.com आणि / किंवा https://bankauctions.in/ यावर तरतूद करण्यात आली आहे.
स्थळ : नाशिक
तारीख : १८.०४.२०२३
प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

RELIANCE COMMERCIAL FINANCE
रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : रिलायन्स कमर्शियल फायनान्स लि., दी रुबी टॉवर, ११वा मजला, नॉर्थ वेस्ट विंग, प्लॉट नं. २९, जे. के. सावंत मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२८. शाखा कार्यालय : प्लॉट नं. २९, जे. के. सावंत मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२८. शाखा कार्यालय : बंगला नं. ७, पहिला मजला, गुरुदत्त को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नाशिक (महानगरपालिका), नाशिक-४२२ ००५.
विक्री नि लिलाव सूचना
मे. रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड (पूर्वी मे. रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात) (इथून पुढे 'आरसीएफएल' असे उल्लेखित) यांचे ऑथोराइज्ड ऑफिसर (एओ) असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी आरसीएफएल यांची २१.०३.२०२३ रोजीनुसार रु. २४,९७,६८६/- (रुपये चोवीस लाख सत्त्याण्णव हजार सहाशे शहाऐंशी फक्त)ची प्रतिभूत ऋणे अधिक व्याज व वाद खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ सोबत वाचावयाच्या दी सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२च्या उपबंधांनुसार निम्नोल्लेखित कर्जदारांच्या निम्न निर्दिष्ट मालमत्तांच्या खरेदीकरिता निविदा/ दरपत्रके मागविली आहेत. मालमत्ता ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विकावयाचे नियोजिले आहे.

कर्जदाराचे नाव आणि पत्ता	१) रवींद्र शिवाजी सैंदणे, २) शालिनी रवींद्र सैंदणे दोघांचेही निवासस्थान- रो हाऊस नं. ३, प्लॉट नं. १५, भूमापन क्र. ५४, २ए, वैष्णवी रो हाऊस, दत्त नगर, अंबडसमोर, नाशिक-४२२ ०१०.
ताबा घेण्याची तारीख आणि मालमत्तेचे/ तारण हितसंबंधांचे तपशील	ताबा घेण्याची तारीख : २९ ऑगस्ट २०१८ चंचले शिवार, जिल्हा नाशिकमधील भूखंड क्र. ६२+६३+६४, गट क्र. ५२+४९/२/१+२+४+५+६/ए यावर बांधलेल्या 'कुलस्वामिनी हाइट्स' इमारतीच्या बी-विंगमधील स्टिल्ट आणि पहिल्या मजल्यावरील ५५३.८१ चौ. फूट म्हणजेच ५१.४७ चौ.मी. बिल्टअप क्षेत्रफळाची सदनिका क्र. बी-६ अंतर्भूत असलेल्या मालमत्तेचे सर्व तुकडे आणि खंड.

राखीव किंमत (रु.)	इसारा रक्कम ठेव (इरठे)	मोहोरबंद दरपत्रके/ बोल्या सादर करण्याची शेवटची तारीख व ठिकाण	लिलावाची/ दरपत्रके/ बोल्या उघडण्याची तारीख व ठिकाण	दरपत्रके/ बोल्या उघडावयाची वेळ
रु. ११,३५,०००/- (रुपये अकरा लाख पस्तीस हजार फक्त)	रु. २,८३,७५०/- (रुपये दोन लाख त्र्याऐंशी हजार सातशे पन्नास फक्त)	१५ मे २०२३ वेळ: सायं. ०५.०० वाजता, बोल्या यांना संबोधित कराव्यात: प्रति ऑथोराइज्ड ऑफिसर, रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड, पत्ता : बंगला क्र. ७, पहिला मजला, गुरुदत्त को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नाशिक (महानगरपालिका), नाशिक-४२२ ००५.	१६ मे २०२३ रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड, पत्ता : बंगला क्र. ७, पहिला मजला, गुरुदत्त को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नाशिक (महानगरपालिका), नाशिक-४२२ ००५.	सकाळी ११.३० वाजता

नोंद : एओ त्यांच्या स्वेच्छाधिकारात बोलीदारांमध्ये परस्पर बोली लावण्यास अनुमती देऊ शकतात.

मालमत्तांची पाहणी	बोलीदारांना/ इच्छुक पक्षकारांना ०८ मे २०२३ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी ०४.०० वाजण्याच्या दरम्यान मालमत्तांची/ साइटची पाहणी करता येईल. इच्छुक पक्षकारांनी रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड यांच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. शाखा कार्यालय : बंगला क्र. ७, पहिला मजला, गुरुदत्त को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नाशिक (महानगरपालिका), नाशिक-४२२ ००५. संपर्काची व्यक्ती : संदीप ठाकूर- ९८८१८८१७९९ किंवा प्रशांत बर्मन- ९०७३९९०७०२.

अटी आणि शर्ती :
इच्छुक पक्षकारांनी नाशिक येथे देय ''रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड'' नावे काढलेल्या प्रदानादेश/ डीडी स्वरूपातील इसारा रक्कम ठेवीसह (इरठे) आपले दरपत्रक/ बोली (चंचले शिवार, जिल्हा- नाशिकमधील भूखंड क्र. ६२+६३+६४, गट क्र. ५२+४९/२/१+२+४+५+६/ए यावर बांधलेल्या 'कुलस्वामिनी हाइट्स' बिल्डिंगच्या बी-विंगमधील स्टिल्ट व पहिल्या मजल्यावरील ५५३.८१ चौ.फूट म्हणजेच ५१.४७ चौ.मी. बिल्टअप क्षेत्रफळाची सदनिका क्र. बी-६ अंतर्भूत असलेल्या मालमत्तेचे सर्व तुकडे आणि खंड)- ''मालमत्तेच्या खरेदीकरिता दरपत्रक'' असे लिफाफ्यावर बाहेर नमूद केलेल्या मोहोरबंद लिफाफ्यांमधून पाठवावी/ सादर करावी.
१) इरठेवर काहीही व्याज मिळणार नाही, यशस्वी पक्षकारांच्या बाबतीत समायोजित करण्यात येईल आणि अशा पक्षकाराने कसूर केल्यास जप्त केली जाईल.
२) कोणत्याही बाबतीत अपूर्ण असलेल्या किंवा स्वाक्षरी न केलेल्या अथवा आवश्यक इरठेचा डीडी/ पीओ समवेत न जोडलेल्या निविदा/ बोल्या एओंच्या एकमात्र स्वेच्छाधिकारात तात्काळ नाकारल्या जाण्यास पात्र राहतील.
३) पूर्वोक्त मालमत्ता, उपरोल्लेखित राखीव किमतीपेक्षा कमी किमतीला विकल्या जाणार नाहीत.
४) यशस्वी पक्षकाराने उद्धृत रकमेच्या २५% रक्कम त्याच दिवशी नाशिक येथे देय ''रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड'' नावे देय पे-ऑर्डर/ डिमाण्ड ड्राफ्ट स्वरूपात तात्काळ जमा करावयाची असून त्या रकमेत जमा केलेली इरठे अंतर्भूत असेल आणि उर्वरित ७५% रक्कम विक्रीच्या पुष्टीच्या तारखेपासून १५ दिवसांत किंवा निम्नस्वाक्षरीकारांनी लेखी संमत केल्याप्रमाणे वाढीव मुदतीत जमा करावयाची आहे. एओ त्यांच्या एक मात्र स्वेच्छाधिकारात प्रदाने देण्याची मुदत लेखी स्वरूपात वाढवू शकतात. नियत तारखांपर्यंत आवश्यक प्रदाने देण्यात अपयश आल्यास इरठे आणि तोपर्यंत प्रदान केलेल्या सर्व रकमा कोणत्याही सूचनेविना जप्त केल्या जातील व मालमत्ता पुन्हा विकण्यात येईल.
५) अशी सर्व प्रदाने केवळ नाशिक येथे देय दी रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड यांच्या नावे काढलेल्या पे-ऑर्डर किंवा डिमाण्ड ड्राफ्ट स्वरूपात द्यावयाची आहेत.
६) मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, कर, आकारणी इत्यादींसारखे विक्रीकरिता/ अभिहस्तांतरणाकरिता देय असलेले आकार/ शुल्के आणि संकीर्ण खर्चसुद्धा यशस्वी पक्षकाराने सोसावयाचा आहे.
७) विक्रीअंतर्गत मालमत्तेच्या बाबतीत कोणताही आकार, धारणाधिकार, बोजा, मालमत्ता कर किंवा शासनाला अथवा कोणालाही देय असलेली अन्य कोणतीही देणी यांसाठी एओ जबाबदार राहणार नाहीत.
८) प्रस्तावात सुधारणा करण्यासाठी सर्वोच्च बोलीदाराबरोबर वाटाघाटी करण्याचा अधिकार एओ यांच्याकडे राखून ठेवण्यात आला आहे आणि कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अथवा लिलाव/ विक्री स्थगित करण्याचा/ पुढे ढकलण्याचा/ रद्द करण्याचा निःशेष अधिकार एओ यांना आहे.
९) दी आरसीएफएल यांच्या पुष्टीवर विक्री अवलंबून आहे.
१०) लिलावाच्या तारखेपूर्वी/ विक्रीच्या पुष्टीपूर्वी कर्जदाराने आरसीएफएल यांना देय असलेली संपूर्ण रक्कम जर प्रदान केली तर लिलाव/ विक्री थांबविली जाण्यास पात्र आहे.
११) एओ यांच्या माहितीनुसार, उपरोल्लेखित मालमत्तांवर अन्य कोणताही बोजा अस्तित्वात नाही.
१२) बोली हस्तांतरणीय नाही.
१३) ही जाहिरात म्हणजे देणी पूर्णतः प्रदान न केल्यास उपरोल्लेखित तारखेरोजी विक्री आयोजित करावयाच्या हेतूची कर्जदारांना आणि हमीदारांना ३० दिवसांची नोटीससुद्धा आहे. खासगी विक्रीद्वारा किंवा दरपत्रक मिळवून कोणत्याही व्यक्तीला मालमत्ता विकण्याचा असा कोणताही प्रस्ताव जर कर्जदाराकडे असेल तर ७ दिवसांत तो निम्नस्वाक्षरीकारांकडे कळवावा.

सरफेसी ॲक्ट, २००२ अंतर्गत ३० दिवसांची वैधानिक विक्री सूचना
कर्जदाराला/ हमीदाराला याद्वारे सूचना देण्यात येते की, बोली उघडावयाच्या तारखेपूर्वी एकूण अदत देणी प्रदान करावीत. जसे न केल्यास प्रतिभूत मत्तांचा लिलाव करण्यात येईल आणि बाकी असल्यास, तुमच्याकडून त्यावरील व्याज, खर्च आणि आकारासह वसूल केली जाईल.

(प्राधिकृत अधिकारी),
स्थळ : नाशिक
नाव : प्रशांत बर्मन
दिनांक : १७.०४.२०२३
रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड